महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ २५ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २१० ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये


## टॅरिफ वाढीचा भारताला मोठा फटका प्रचंड आयात शुल्क लागू

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

अमेरिकेनं भारतावर टॅरिफ लावला आहे, गेल्या ऑगस्ट महिन्यात अमेरिकेकडून भारतावर 50 टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा करण्यात आली होती. भारत रशियाकडून तेलाची खरेदी करतो म्हणून अमेरिकेनं भारतावर 50 टक्के टॅरिफ लावला आहे. एवढंच नाही तर अमेरिकेकडून सातत्यानं भारतावर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. अमेरिकेन व्हिसाबाबतचे देखील काही नियम बदलले आहेत. त्याचा थेट फटका हा भारतीय नागरिकांना बसला आहे, कारण जगातील इतर देशांच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात भारतीय नागरिक हे नोकरीच्या निमित्तानं अमेरिकेत स्थायिक झालेले आहेत. तसेच काही दिवसांपूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला 500 टक्के टॅरिफ



लावण्याची धमकी देखील दिली होती. आता मोठी बातमी समोर येत आहे, ती म्हणजे भारतावरील टॅरिफ पुन्हा एकदा वाढला आहे. एकीकडे युरोपियन यूनियन आणि भारतामध्ये एका मोठ्या व्यापारी डील संदर्भात बोलणी सुरू आहेत. पुढच्या आठवड्यात ट्रेड डीलसंदर्भात मोठी घोषणा होण्याची शक्यता आहे.

तर दुसरीकडे ट्रेड डील संदर्भात बोलणी सुरू असतानाच आता युरोपने भारताला मोठा दणका दिला आहे. युरोपियन संघ आता जनरलाइज्ड सिस्टम ऑफ प्रेफरन्स (GSP) संपुष्टात आणणार आहे. याचाच अर्थ आता भारताला युरोपियन यूनियन कडून निर्यातीमध्ये जी सूट मिळत होती, ती सर्व समाप्त होणार आहे. हा भारतासाठी मोठा धक्का मानला जात आहे. आता भारताला निर्यातीवर मोठा टॅरिफ लागणार आहे. समोर आलेल्या माहितीनुसार याचा परिणाम हा भारताच्या जवळपास 87 टक्के निर्यातीवर होणार आहे. मात्र या संदर्भात भारताच्या अर्थ मंत्रालयाकडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे, ज्यामध्ये म्हटलं आहे की याचा परिणाम हा केवळ 2.66 टक्क्यांपर्यंतच होऊ शकतो.

**काय आहे जीएसपी?**

जीएसपी म्हणजे जनरलाइज्ड सिस्टम ऑफ प्रेफरन्स आहे, ज्या द्वारे जे विकसनशील देश आहेत, त्यांना युरोपमध्ये सामान निर्यातीवर टॅरिफमध्ये विशेष सूट मिळते, त्यामुळे त्या देशांचा फायदा होतो. दरम्यान मात्र आता युरोपने मोठा निर्णय घेतला आहे. 1 जानेवारी 2026 पासून ते 31 डिसेंबर 2028 पर्यंत युरोपने भारत, इंडोनेशिया आणि केनिया या तीन देशांना यातून वगळण्याचा निर्णय घेतला आहे, त्यामुळे आता भारताला युरोपमध्ये आपलं सामान निर्यात करायचं असेल तर जास्त टॅरिफ लागणार आहे.

**का घेण्यात आला निर्णय**

युरोपियन यूनियन आणि भारतामध्ये एक मोठी व्यापारी डील होणार आहे, त्यापूर्वीच हा निर्णय घेण्यात आला आहे. जेव्हा एखाद्या देशाची निर्यात गरजेपेक्षा जास्त वाढते तेव्हा अशा देशांना मिळणारी सूट ही समाप्त केली जाते. त्यामुळेच भारत इंडोनेशिया आणि केनिया या तीन देशांना या करारामधून वगळण्यात आलं आहे.

## कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यासाठी युवकांनी तयार रहावे - राजनाथ सिंह



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

जग अनिश्चिततेच्या टप्प्यातून जात असल्याने देशातल्या युवकांनी कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यासाठी तयार रहावं असं आवाहन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं आहे. नवी दिल्लीत प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित राष्ट्रीय छात्रसेनेच्या शिबिरात बोलत होते. एन सी सी केवळ संचलन आणि शिबिरापुरते मर्यादित नसून शिस्त आणि देशभक्ती अंगी भिनवण्यासाठी तसंच स्वयं सुधारणेसाठी एक मंच असल्याचं त्यांनी सांगितलं.

## लक्षवेधी

### भारतीय वस्त्रोद्योगाची उलाढाल दशकात १६ लाख कोटींवर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

गेल्या दशकभरात भारतीय वस्त्रोद्योग क्षेत्रात उल्लेखनीय वाढ झाली असून हा उद्योग १६ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचं केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनी म्हटलं आहे. ते नवी दिल्ली इथं ७४ व्या भारत आंतरराष्ट्रीय वस्त्र मेळ्यात बोलत होते. वस्रोद्योग हा देशातल्या सर्वाधिक रोजगार निर्मिती करणाऱ्या उद्योगांपैकी एक झाल्याचं गिरीराज सिंह म्हणाले. अनेक योजनांची अंमलबजावणी केल्यामुळे वस्त्रोद्योग क्षेत्राच्या वाढीतले अनेक अडथळे दूर झाले आहेत, त्यामुळे निर्यातीत देखील वाढ झाल्याचं त्यांनी सांगितलं. अर्जेंटिनाला ७७ टक्के, इजिप्तला ३० टक्के, पोलंड आणि जपानला २० टक्के, स्वीडन आणि फ्रान्सला दहा टक्के निर्यात वाढल्याचं गिरीराज सिंह यांन नमूद केलं.

### राष्ट्रीय बालिका दिवस देशभरात साजरा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

राष्ट्रीय बालिका दिवस आज देशभरात साजरा केला जात आहे. मुलींचे अधिकार, आरोग्य, पोषण आणि कल्याण अबाधित राखत लैंगिक समानता, समान अधिकार तसंच मुलींची सक्षम नागरिक म्हणून ओळख निर्माण होण्यासाठी अनुकूल वातावरण तयार व्हायला प्रोत्साहन मिळावं या उद्देशानं दरवर्षी २४ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय बालिका दिवस म्हणून साजरा केला जातो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २२ जानेवारी २०१५ रोजी सुरु केलेल्या 'बेटी बचाओ-बेटी पढाओ' योजनेचा वर्धापन दिन म्हणूनही हा दिवस देशभर साजरा केला जात आहे. महिला आणि बालविकास मंत्रालयाच्या पुढाकारानं २००८ मध्ये पहिल्यांदा हा दिवस साजरा केला होता.

### कर्तव्यात कसूर व गैरवर्तन केल्यास बूथ स्तरीय अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

भारतीय निवडणूक आयोगानं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना बूथ स्तरीय अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर आणि गैरवर्तन केल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. कर्तव्यात कसूर, हलगर्जीपणा, गैरवर्तन, आपल्या सूचनांचं जाणूनबुजून पालन न करणं किंवा लोकप्रतिनिधी कायदा आणि मतदार नोंदणी नियमांच्या तरतुदींचं उल्लंघन यासारख्या प्रकरणांमध्ये निलंबनासह कठोर कारवाई केली जाईल, असं आयोगानं मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. गुन्हेगारी स्वरुपाच्या गैरवर्तनाचे प्रकार आढळल्यास एफआयआरही नोंदवला जाऊ शकतो असंही आयोगानं म्हटलं आहे.

## मिशन सुधार मोहिमेत ठाणे जिल्ह्यात अपात्र लाभार्थ्यांची नावे रद्द होणार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे : 'मिशन सुधार अभियान' अंतर्गत राज्यातील शिधापत्रिकांचे शुद्धीकरण करून मृत, दुबार, संशयास्पद लाभार्थीना वगळण्याचे काम सुरू आहे. आधार क्रमांक आणि व्यवस्थेतील माहितीच्या आधारे जिल्हानिहाय संशयास्पद लाभार्थीची यादी केली असून पुरवठा निरीक्षक घरोघरी तपासणी करत आहेत. ही नावे वगळण्याचे अंतिम अधिकार तहसीलदारांना दिले आहेत.**



ठाणे जिल्ह्यात ५७ हजार ९७२ अपात्र लाभार्थीची नोंद आढळली असून ही नावे रद्द करण्यात आली आहेत.

**घरोघरी जाऊन तपासणी सुरू**

प्राप्त लाभार्थीच्या यादीप्रमाणे पुरवठा निरीक्षकांकडून घरोघरी प्रत्यक्ष तपासणी करण्यात येत आहे. लाभार्थीची वास्तव स्थिती, वास्तव्य व कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे व त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

**अपात्र लाभार्थी**

जिल्ह्यातील शहरासाठी सक्रिय असलेल्या शिधावाटप विभागाच्या 'फ' परिमंडळाच्या कार्यक्षेत्रात एकूण ५७हजार ९७२ लाभार्थी अपात्र ठरविण्यात आले आहेत.

**जिल्ह्यात २४ हजार लाभार्थीवर गंडांतर**

ठाणे जिल्ह्यात ५७ हजार ९७२ अपात्र लाभार्थीची नोंद आढळली असून ही नावे आता रद्द केली आहेत.

**शिधापत्रिकांचे शुद्धीकरण अभियान झाले सुरू**

शिधापत्रिकांमधील अपात्र, मृत व दुबार लाभार्थी वगळून पात्र लाभार्थ्यांनाच सरकारी लाभ मिळावा, या उद्देशाने 'मिशन सुधार अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानामुळे वितरण व्यवस्था अधिक पारदर्शक व विश्वासार्ह होत आहे. पालिकेकडून मृत लाभार्थीची यादी प्राप्त झाली असून त्यापैकी आरसीएमएसमधून ८० हजार ३२५ मृत लाभार्थी वगळले आहेत. तर चार हजार ५३९ दुबार शिधापत्रिका रद्द केल्या आहेत.

**यंत्रणेतील माहिती, आधार क्रमांकाचा आधार**

आरसीएमएस व एईपीडीएस प्रणालीतील माहिती, तसेच आधार क्रमांकाच्या आधारे लाभार्थीची ओळख निश्चित करण्यात येत आहे. आधार-सीडिंगमुळे दुबार व बनावट नोंदी शोधणे सोपे झाले आहे.

**धान्य उचल, वार्षिक उत्पन्नाचीही पडताळणी**

नियतननुसार १०० टक्के धान्य उचल होत आहे. नोव्हेंबरमध्ये एकूण सात लाख पाच हजार ३२४ शिधापत्रिकांपैकी सहा लाख ८० हजार ६३६ शिधापत्रिकांवर वितरण झाले आहे. असे एकूण ९६.५० टक्के शिधापत्रिकेवर धान्य वितरण झाले आहे. लाभार्थीची धान्य उचल नियमित आहे की नाही, तसेच कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न निकषात बसते का, याची सखोल तपासणी केली जात आहे. उत्पन्न मर्यादा ओलांडणाऱ्या लाभार्थीना अपात्र ठरविण्यात येत आहे.

## मुंबईतील ऐतिहासिक पार्ले-जी फॅक्टरी बंद

### पर्यावरण विभागाचा मोठा निर्णय

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** विले पार्ले (पूर्व)येथील भारतातील सर्वात जुन्या आणि प्रसिद्ध बिस्किट कारखान्याच्या ठिकाणी विनिर्माण संकुलाचे व्यावसायिक संकुलात पुनर्विकास करण्याची योजना पार्ले प्रोडक्ट्सने आखली आहे. पर्यावरण,वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या (MoEFCC) अंतर्गत असलेल्या राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाने (SEIAA) 7 जानेवारी रोजी या प्रकल्पाला अंशत: मंजुरी दिली. यामुळे ज्यामुळे जागेवरील 21 जीर्ण झालेल्या बांधकामाला पाडण्याची परवानगी मिळाली.

कंपनीने सर्वप्रथम 2025 च्या मध्यात मुंबई महानगरपालिकेकडे (MCGM)



पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर केला आणि त्यानंतर पर्यावरणीय मंजुरी मिळवण्याचा प्रयत्न केला.विले पार्ले (पूर्व) येथील 5.44 हेक्टर (13.45 एकर) किंवा 54,438.80 चौ. मीटरच्या महत्त्वाच्या भूखंडाचा 1,90,360.52 चौ. मीटर बांधकाम क्षेत्रासह पुनर्विकास करण्याचा प्रस्ताव आहे. यात 1,21,698.09 चौ. मीटर एफएसआय क्षेत्र आणि 68,662.43 चौ. मीटर गैर-एफएसआय बांधकामाचा समावेश आहे. या प्रकल्पाचा अंदाजित खर्च 3,961.39 कोटी आहे.

पुनर्विकासासाठी सादर केलेल्या योजनांमध्ये चार इमारतींसोबतच तीन आणि सहा मजली अशा दोन स्वतंत्र पार्किंग टॉवरांच्या प्रस्तावाचा समावेश आहे. ऑक्टोबर 2025 मध्ये,भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाने (AAI) विमानतळाची जवळीक आणि एअर फनेल झोनमध्ये प्रकल्पाचे स्थान लक्षात घेऊन,एका इमारतीसाठी 30.40 मीटर आणि दुसऱ्यासाठी 28.81 मीटर उंची मर्यादेसह अनापत्ती प्रमाणपत्र (NOC) जारी केले.

## स्पंदन फेस्ट २०२६ मध्ये कामलताई कथोरे महाविद्यालयाचा गौरव





**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**गोवेली :** दि. २४ जानेवारी २०२६ रोजी जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे BMS विभाग आयोजित स्पंदन फेस्ट २०२६ मध्ये सौ. कमलताई किसन कथोरे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एकूण ०४ स्पर्धेत सहभाग नोंदवला त्यापैकी गायन स्पर्धेत कु. देवेश निचिते तर पोस्टर मेकिंग स्पर्धेत कु. तुषार अहिरे या दोघांनी उपविजेतेपद पटकावले. यावेळी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विजय सोनार विद्यार्थ्यांसोबत उपस्थित होते. या यशाबद्दल जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर, संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे मॅम, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केलं व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## भिवंडी महापालिकेत सत्ता स्थापनेसाठी काँग्रेस–राष्ट्रवादी–सपाची युती




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** मागील निवडणुकीत एकहाती सत्ता मिळाल्यानंतरही फोडाफोडीच्या राजकारणामुळे सत्ता गमावावी लागलेल्या काँग्रेस पक्षाने मागचा अनुभव लक्षात घेऊन यंदा सत्तास्थापनेबाबत सावध भुमिका घेतली आहे. यंदाच्या निवडणुक निकालानंतर काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी (शरद पवार) पक्ष, समाजवादी या तिघांनी एकत्रित येऊन धर्मनिरपेक्ष विचारसरणीचा महापौर बसविण्यासाठी 'भिवंडी सेक्युलर फ्रंट'ची स्थापना केली असून यावेळी बोलताना सपाचे आमदार रईस शेख यांनी महापौर पदाबाबत मोठे विधान करत 'भिवंडीत आता कोणीही विकला जाणार नाही', असे सुचक वक्तव्य केले.

भिवंडी महापालिकेत नगरसेवक पदाच्या एकूण ९० जागा आहेत. या जागांसाठी ४३८ उमेदवारांनी निवडणुक लढविली. त्यात ३४८ उमेदवारांचा पराभव झाला. या निवडणुकीत भाजपचे २२, काँग्रेसचे ३०, शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे १२, राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे १२, समाजवादी पक्षाचे ६, कोणार्क विकास आघाडीचे ४, भिवंडी विकास आघाडी (एकता मंच) चे ३ आणि अपक्ष १ असे ९० नगरसेवक निवडून आले आहेत.

महापालिकेत सत्तास्थापनेसाठी ४६ नगरसेवकांचे बहुमत असणे आवश्यक आहे. परंतु एकाही पक्षाला सत्तास्थापनेसाठी आवश्यक असलेला ४६ चा जादुई आकडा गाठणे शक्य झालेले नाही.. यामुळेच काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी (शरद पवार) पक्ष, समाजवादी या तिघांनी एकत्रित येऊन सत्ता स्थापनेसाठी हालचाली सुरू केल्या आहेत.

## ठाण्यात अरुणोदय सिकलसेल अभियानांतर्गत २३६ संशयित सिकलसेल रुग्ण

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे, ता. २४ :** जिल्ह्यातील अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत ३१ हजार २१ व्यक्तींच्या सोल्युबिलिटी तपासण्या करण्यात आल्या. त्यामध्ये २३६ संशयित सिकलसेल व्यक्ती आढळून आल्या आहेत. त्यापैकी २१४ नमुने इलेक्ट्रोफोरेसिस तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

ठाणे जिल्ह्यात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी या कालावधीत प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानाची अंमलबजावणी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या अधिपत्याखाली करण्यात येत आहे. जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागांमध्ये ० ते ४० वयोगटातील नागरिकांची सिकलसेल तपासणी मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. तसेच व्यापक जनजागृती मोहीमही राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, अंगणवाडीसेविका, आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी व स्थानिक प्रशासन यांच्या समन्वयातून हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

**अभियानाची सद्यस्थिती**

जिल्ह्यातील विविध भागांमध्ये १५ ते २१ जानेवारी या कालावधीत ३९ हजार ९७९ घरभेटी देण्यात आल्या. घरभेटीदरम्यान ७५ सिकलसेल रुग्णांना; तसेच ७५१ सिकलसेल वाहक व्यक्तींना भेट देऊन आवश्यक मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात आले. याच कालावधीत ३१ हजार २१ व्यक्तींच्या सोल्युबिलिटी तपासण्या केल्या. त्यामध्ये २३६ संशयित सिकलसेल व्यक्ती आढळून आल्या आहेत. त्यापैकी २१४ नमुने इलेक्ट्रोफोरेसिस तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविले आहेत.




दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com





# प्रा. संभाजी शेळके राज्यस्तरीय सह्याद्री भुषण पुरस्काराने सन्मानित




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** अज्ञान, अंधश्रद्धा निर्मूलन व ग्राम स्वच्छतेचे ध्वज भडकावून सामाजिक सामाजिक बांधिलकी जपणारे जय मल्हार आदिवासी विकास सेवा मंडळ संचलित श्री संत गाडगे बाबा परिवार महाराष्ट्र राज्य सेवा संघ ओतूर ही संस्था गेली 27 वर्ष विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा श्री संत गाडगे महाराज जीवन गौरव राजस्तरीय सहयाद्री भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करते.

राजे संस्कार प्रतिष्ठानचे अध्यक्ष, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे प्राध्यापक, भारतीय जनता पार्टी शिक्षक सेलच्या ठाणे शहर ( जिल्हा ) अध्यक्ष प्रा. संभाजी शेळके सर यांच्या धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय व पारमार्थिक अशा विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना श्री संत गाडगे महाराज जीवन गौरव राजस्तरीय 'सहयाद्री भूषण पुरस्काराने शाल, श्रीफळ, सन्मामान चिन्ह, प्रमाणपत्र देऊन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भीमराव ठोंगिरे, सल्लागार टी. एन. शिरसाठ, सचिव यशवंतराव मोहरे यांचे हस्ते गौरविण्यात आले.

# कल्याणमध्ये तोतया इन्स्पेक्टरचा पर्दाफाश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याणमध्ये रेल्वेच्या व्हिजिलन्स विभागाने सापळा रचत तोतया व्हिजिलन्स इन्स्पेक्टरचा पर्दाफाश केला. हरीश कांबळे असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याला कल्याण रेल्वे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हरीश कांबळे हा स्वतःला रेल्वे व्हिजिलन्स इन्स्पेक्टर असल्याचे भासवत होता. संबंधित बुकिंग क्लार्कचे रेल्वेच्या डीआरएम कार्यालयात अडकलेले पैसे काढून देतो, असे प्रलोभन दाखवत त्याने तब्बल ६० हजार रुपयांची मागणी केली होती. या प्रकरणाची माहिती रेल्वे व्हिजिलन्स विभागाला मिळताच त्यांनी तत्काळ कारवाईचे पाऊल उचलले. व्हिजिलन्स पथकाने सापळा रचला. बुकिंग क्लार्ककडून २० हजार रुपयांची रक्कम स्वीकारताना व्हिजिलन्स पथकाने त्याला रंगेहाथ पकडले. त्यानंतर त्याला कल्याण रेल्वे पोलिसांच्या ताब्यात दिले.

# राष्ट्रीय मतदार दिन



स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन हे दोन आपले राष्ट्रीय सण आहेत हे आपणा सर्वांना माहीतच आहे या दिवशी देशभक्ती ओसंडून वाहत असते पण या दिवसा इतकाच आजचा दिवसही तितकाच म्हत्वाचा आहे हे अनेक लोकांना माहीत नाही. आज २५ जानेवारी आज राष्ट्रीय मतदार दिन.आजच्याच दिवशी भारतीय लोकशाहीचा पाया रचला गेला. आजच्याच दिवशी म्हणजे २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली म्हणून हा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. भारतीय लोकशाहीने प्रत्येक सुजाण नागरिकाला मतदानाचा मूलभूत हक्क बहाल केला आहे. त्यामुळे मतदार यादीत नाव नोंदवून प्रत्येक नागरिकांनी निवडणुकीत आपले मतदान नोंदवून लोकशाही बळकट करावी असा उद्देश या दिवसामागे आहे. म्हणून या दिवशी भारत निवडणूक आयोग विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन मतदानासंदर्भात जनजागृती करते. या दिवशी १८ वर्ष पूर्ण झालेल्या नवीन मतदारांची नोंद करून त्यांना भारत निवडणूक आयोगाचे ओळखपत्र दिले जाते. मतदान हे प्रत्येक सुजाण नागरिकांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. १८ वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिकांना संविधानाच्या अनुच्छेद ३२६ नुसार मतदानाचा हक्क दिला आहे. मतदान करणे ही देखील देशसेवाच आहे. त्यामुळे जास्तीतजास्त लोकांनी मतदान करुन भारतीय लोकशाहीला बळकट करायला हवे मात्र आपल्या देशात आजही मतदार मतदानाबाबत गंभीर आहेत असे दिसत नाही. घटनाकारांनी मतदानाचा अधिकार बहाल करून देशवासियांना खूप मोठे अस्त्र दिले आहे पण दुर्दैवाने आजही लोकांना त्याचे महत्व नाही म्हणूनच आपल्या देशात कोणत्याही निवडणुकीत ६० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान होत नाही याचाच अर्थ देशातील ४० टक्के मतदार मतदान करित नाहीत. भारतीय मतदारांचा मतदानाबाबतचा हा निरुत्साह लोकशाहीला मारक आहे. विशेष म्हणजे सुशिक्षित वर्गातच मतदानाविषयी निरुत्साह दिसून येतो. मतदानादिवशी राष्ट्रीय सुट्टी असते या दिवशी मतदान करण्याऐवजी सहकुटुंब सहलीला जाण्याचा ट्रेंड सुशिक्षित वर्गात दिसून येतो आपण एकट्याने मतदान केले नाही तर काय फरक पडणार असाच आविर्भाव या लोकांमध्ये दिसून येतो. जे मतदान करतात त्यातील काही लोक मतदान करण्याऐवजी आपल्या मताची विक्री करतात. रोटी, बोटी, आणि चपटीसाठी काही जण आपले मत अक्षरशः विकतात. अर्थात सर्वचजण असे करतात असे नाही. बहुतेक जण विचार करुन आपल्या देशासाठी, समाजासाठी योग्य अशा उमेदवाराला मतदान करतात हे ही नाकारून चालणार नाही अशा लोकांची संख्या वाढली पाहिजे. लक्ष्मी दर्शन झाल्यानंतरच मतदान करणारे लोक बाबासाहेबांनी दिलेल्या या अस्त्राचा दुरुपयोग करतात. या लोकांमुळेच लोकशाही कलंकित होत आहे. बाबासाहेबांनी हे अस्त्र आपल्या हाती देण्यासाठी किती कष्ट सोसले याचीही जाणीव या लोकांना नाही. संविधानात मतदानाचा मूलभूत हक्क समाविष्ट करून बाबासाहेबांनी आपल्याला सर्वात मोठा हक्क मिळवून दिला आहे. आपलव हा मतदानाचा पवित्र हक्क बजावून प्रत्येकाने लोकशाही बळकट करायला हवी. प्रत्येकाने मतदानाचा हक्क जबाबदारीने बाजावल्यास देशाचे भविष्य बदलू शकते. त्यामुळे प्रत्येकाने निराशावादी भूमिका सोडून जागरूकतेने व स्वयंस्फूर्तीने प्रत्येक निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावून राष्ट्रीय कार्यामध्ये आपला खारीचा वाटा उचलायला हवा. लोकशाहीचे बळकटीकरण करावयाचे असेल तर जागरुक मतदारांचा एक मोठा वर्ग अस्तित्वात येणे आवश्यक आहे. त्यामुळे आपला देश विकसनशीलतेकडून विकसित देश होण्याकडे निश्चितच मदत होईल. १८ वर्षांपुढील सर्व सुजाण नागरिकांनी आगामी निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावला तरच राष्ट्रीय मतदार दिन साजरा केल्याचे सार्थक होईल.

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# नवनिर्वाचित नगरसेवक गणेश पाटील यांचा मारवाडी समाजाच्या वतीने सन्मान



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** प्रभाग क्रमांक १८ चे नवनिर्वाचित भाजपा नगरसेवक गणेश पाटील यांच्या विजयामुळे प्रभागात उत्साहाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर प्रभागातील संपूर्ण मारवाडी समाजाच्या वतीने गणेश पाटील यांची सदिच्छा भेट घेण्यात आली. या भेटीदरम्यान मारवाडी समाजाने त्यांच्या परंपरा व संस्कृतीनुसार नगरसेवक गणेश पाटील यांचा सन्मान केला. त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत पगडी परिधान करून गौरव करण्यात आला तसेच स्वाभिमान, शौर्य आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक असलेल्या महाराणा प्रताप यांची प्रतिमा भेट देऊन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

मारवाडी समाजाने पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग क्रमांक १८ च्या विकासासाठी पूर्ण सहकार्य करण्याची ग्वाही दिली. यावेळी बोलताना गणेश पाटील यांनी प्रभागातील सर्व समाजघटकांना सोबत घेऊन पारदर्शक व विकासाभिमुख कारभार करण्याचा निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रमास मारवाडी समाजाचे पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक, युवक कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. प्रभागातील विविध समाजघटकांकडून नगरसेवक गणेश पाटील यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, आगामी काळात प्रभागाच्या विकासाला गती मिळेल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.

नियमित वाचा
दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# मुरबाड नगरीत रंगणार भव्य भक्तिमहोत्सव

## 2 फेब्रुवारी पासून अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड :** गुरूप्रतिपदेच्या पर्वकाळी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पटांगणात मुरबाड तालुका भागवत वारकरी समाजसेवा मंडळाच्या विद्यमाने भव्य असा अखंड हरिनाम सप्ताह सोमवार दिनांक २ फेब्रुवारी ते सोमवार दिनांक ९ फेब्रुवारी या कालखंडात आयोजित करण्यात आला आहे. इ.स. १९९८ साली गुरुवर्य वैकुंठवासी श्रीराम दादा जोशी यांनी अनुष्ठानपूर्वक सामुदायिक श्रीज्ञानेश्वरी पारायणाची मुहूर्तमेढ मुरबाडच्या मातीत रोवली. यावर्षी पारायण सोहळ्याचे एकोणतीसावे वर्ष आहे. आचार्य अशोकभाई खरे , नीलेशजी जोशी आणि योगी फुलनाथ महाराज यांच्या पावन उपस्थितीत पारायण सोहळ्याचा प्रारंभ होईल.पारायण नेतृत्व श्रीमहंत प्रमोद महाराज जगताप आणि पारायणाचार्य एकनाथ महाराज कोष्टी करणार आहेत.सदर उत्सवात पुणे येथील वेदमूर्ती मंदारशास्त्री खळदकर यांची दररोज सायंकाळी चार ते सहा या वेळेत श्रीरामरक्षा या विषयावर प्रवचने होणार आहेत.रोज रात्री आठ ते दहा या वेळेत सर्वश्री विक्रांत महाराज पोंडेकर,श्री. जयेश महाराज भाग्यवंत,श्री.सुभाष महाराज गेठे,श्री.माधवदास महाराज राठी, श्री. भगीरथ महाराज काळे, श्री. ओंकार महाराज दुडे,आचार्य डॉ.रामकृष्णमहाराज लहवितकर यांची कीर्तने होणार आहेत.दिनांक आठ फेब्रुवारीला भव्य पालखी सोहळा आणि दिव्य असा दीपोत्सव संपन्न होईल. सोमवार दिनांक नऊ रोजी वैष्णवभूषण श्रीमहंत प्रमोद महाराज जगताप यांच्या काल्याच्या कीर्तनाने उत्सवाची सांगता होणार आहे.या महोत्सवात हजारो भाविकांना अन्नदानही करण्यात येणार आहे.या धर्मकार्यात भाविकांनी सर्वतोपरी सहकार्य करावे तसेच सोहळ्यात उपस्थित राहून भक्तिसुखाचा आनंद लुटावा असे आवाहन उपरोक्त मंडळाने केले आहे.

# रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा | एक लाख कोटींची गुंतवणूक अपेक्षित

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण : स्वित्झर्लंडमध्ये वर्ल्ड ईकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीच्या निमित्ताने करण्यात येणारा दावोस दौरा हा भारतात आणि पर्यायाने महाराष्ट्रात ज्ञान, तंत्रज्ञान आणि विदेशी गुंतवणूक मिळविण्यासाठीचा महत्वाचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले. दरम्यान, दुसऱ्या दिवशी तिसऱ्या मुंबईतील पहिले शहर म्हणून रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा करण्यात आली.**

आज प्रामुख्याने धोरणात्मक असे सामंजस्य करार करण्यात आले. ज्यामध्ये युनिव्हर्सिटी ऑफ कॅलीफोर्निया, युनिव्हर्सिटी ऑफ बर्कले, टेक्निकल युनिव्हर्सिटी ऑफ म्युनिक, अर्बन फ्युचर्स कलेक्टिव्ह -लंडन, आयसीसीआय-इटली, अँलॉग ट्युनिंग इन्स्टिट्यूट, नॉर्वेजीयन जीओ टेक्निकल इन्स्टिट्यूट, अर्बन प्लॅनिंगमधील सुबाना जुराँग – सिंगापूर यांच्यासोबत टेक्निकल सामंजय्स करार केले आहेत. यातून एक प्रकारे आम्ही केवळ गुंतवणूक नाही, तर ज्ञान आणि तंत्रज्ञान आणतो.

यातून मोठ्या प्रमाणात उद्योग आणता येतील, वेगवेगळ्या क्षेत्रात चांगल्यारितीने काम करता येईल. अर्बन प्लॅनिंग, ट्रान्सपोर्टशी संबंधित करारांमुळे प्रत्येक शहरातील वाहतूक सुविधांची सरंचना चांगल्या रितीने करता येणार आहे.

दावोस दौऱ्यातून नॉलेज –ज्ञान, टेक्नॉलॉजी – तंत्रज्ञान आणि एफडीआय – विदेशी गुंतवणूक मिळविता येते. त्याचा देशाला आणि पर्यायाने राज्याला मोठा फायदा होतो. यंदा नागरी क्षेत्रातील नियोजन आणि परिवहन व्यवस्थेच्या दृष्टीने या क्षेत्रातील दिग्गज कंपन्याशी संवाद, समन्वय साधता आल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

### शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सुविधा पोहचविण्यासाठी मेडटेक सहकार्य

राज्यातील शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार आणि तत्पर आरोग्य सुविधा पोहचविण्याचा प्रय़त्न आहे. त्यादृष्टीने यंदा दावोसमध्ये मेडीकल-टेक्नॉलॉजीबाबत एका सत्रात चांगली आणि सकारात्मक चर्चा केल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले. यातून राज्यातील आरोग्य सुविधांसाठीचा रोडमॅप निश्चित करण्यात आला. यातून आपल्याला राज्यात मेड-टेक स्टार्टअपची चांगली इकोसिस्टिम निर्माण करण्याचा प्रय़त्न. त्यासाठी जगातील अशी सुविधा उभ्या करणाऱ्या सर्वोत्तम कंपनीशी करार करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

### रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा, नवीन बिझनेस डिस्ट्रीक्टची निर्मिती

नवी मुंबई विमानतळापासून पंधरा ते वीस किलोमीटरवर हे ग्रोथ सेंटर निर्माण करण्यात येणार आहे. त्याबाबत दावोसमध्ये घोषणा करण्यात आली. गेल्या तीन-चार वर्षांपासून यासाठीच्या परवानग्या मिळविण्यात येत होत्या. त्या मिळाल्यानंतर आज या तिसऱ्या मुंबईतील पहिल्या शहराची घोषणा करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. याठिकाणी प्लग अँण्ड प्ले या धर्तीवर रेडी टू स्टार्ट पद्धतीने संबंधित घटक लगेच कामकाज सुरु शकणार आहेत. ही देशातील पहिली कंपनी, यामध्ये खासगी – सार्वजनिक भागीदारी (पीपीपी) प्रकल्प असणार आहे. यात शासन, एमएमआरडीए आणि खासगी घटक एकत्र येऊन काम करतील. याठिकाणी नवीन बिझनेस डीस्ट्रिक्ट तयार करतो आहोत. याठिकाणी चांगल्या पगाराच्या नोकऱ्या तसेच ग्लोबल कॅपिसीटी सेंटर्स, फिनटेकची इकोसिस्टम तयार होईल. बीकेसीच्या धर्तीवर याठिकाणी बिझनेस डिस्ट्रीक्ट स्थापन होईल. या शहराच्या घोषणेनंतर सुमारे एक लाख कोटींच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार देखील झाल्या आहेत. यासाठी जगातील दिग्गज अशा कंपन्यांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे. त्यामध्ये रिपब्लिक ऑफ कोरीयाचा हवाना ग्रुप, स्वित्झर्लंडमधून एसएसबी ग्रुप, एन्सार, फेडेक्स हे अमेरितील समूह, फिनलंडचा रिव्हर रिसायकल समूह, दुबईचा एमजीएसए समूह, सिंगापूरचा स्पेसेस होल्डिंग मेपल ट्री, जीनव्ही आणि इंडोस्पेस पार्क समूह, अमेरिकेतून ट्रिबेका डेव्हलपर्स. या विदेशी गुंतवणूकीतून एक खूप चांगले शहर तयार होईल. याठिकाणी वॉक टू वर्क अशा पद्धतीने सुविधा निर्माण होतील. अशा रितीने तिसऱ्या मुंबईतील पहिले शहर आता प्रत्यक्षात येणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी जाहीर केले.

### दावोसमध्ये महाराष्ट्र पॅव्हेलियनच 'मॅग्नेटिक'; उद्योग, गुंतवणूकदारांच्या आवर्जून भेटी

दरम्यान, दावोसमध्ये साकारण्यात आलेले मॅग्नेटिक महाराष्ट्राचे पॅव्हेलियन आकर्षणाचे केंद्र राहिल्याचे चित्र होते. या पॅव्हेलियनला विविध क्षेत्रातील उद्योजक, गुंतवणूकदारांसह, भारतातील मान्यवरांनी आवर्जून भेट दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्राच्या प्रतिनिधी मंडळाने या सर्व मान्यवरांचे स्वागत केले. दरम्यान, दावोस दौऱ्यावर आलेल्या भारताचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची इंडिया पॅव्हेलियनमध्ये मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सदिच्छा भेट घेऊन, त्यांना शुभेच्छा दिल्या.

### जागतिक बँकेचे अध्यक्ष बंगा यांच्याशी चर्चा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जागतिक बँकेचे अध्यक्ष अजय बंगा यांच्याशी चर्चा केली. यामध्ये महाराष्ट्रात हरित औद्योगीक पट्टा (ग्रीन इंडस्ट्रीयल कॉरिडॉर) विकसित करण्याच्या अनुषंगाने चर्चा झाली. यामुळे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात विदेशी गुंतवणूक येऊ शकते. यातून एमएसएमई क्षेत्रातील स्पर्धात्मक वातावरण तसेच निर्यात क्षमतेला मोठा वाव मिळणार आहे. शासन आणि बँकेच्या सहकार्यातून महाराष्ट्रातील धोरणात्मक आणि प्रभावी औद्योगिक विकासाला चालना देता येणार आहे.

### बर्मुडाचे पंतप्रधान बर्ट यांच्याशी संवाद

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि बर्मुडाचे पंतप्रधान डेव्हिड बर्ट यांची भेट झाली. या भेटीत उभयतांनी विविध विषयांवर चर्चा केली. सर्वसमावेशक विकास, लोकाभिमूखता आणि विकास क्षेत्रातील नाविन्यपूर्णता या अनुषंगाने धोरणात्मक चर्चा झाली. महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी आणि जगभरातील विविध घटकांच्या दृष्टीने स्वागतशील भूमिका घेऊन सज्ज आहे. यातून पारदर्शक, विश्वासार्ह आणि दीर्घकालीन अशी व्यवस्था निर्माण होणे अपेक्षित आहे. अशा संवादातून एक आंतरराष्ट्रीय स्तरावरील दृढ संबंध प्रस्थापित होतील.

ह्युंदाईचे अध्यक्ष सुंग किम यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांची भेट घेतली. महाराष्ट्रात असणे हे आमच्यासाठी आनंददायी आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. राज्य सरकारने जाहीर केलेले ईव्ही धोरण अतिशय चांगले असून येणाऱ्या काळात 5 नवीन ईव्ही मॉडेल्स आणणार असल्याचे त्यांनी सांगितले. ह्युंदाई सीएसआर क्षेत्रात सुद्धा मोठे काम करीत असून शिक्षण, प्रशिक्षण आणि कौशल्य विकास या क्षेत्रात अधिक सहकार्य करण्याबाबत यावेळी चर्चा झाली. ह्युंदाईच्या पुणे येथील प्रकल्पाच्या उद्घाटनाचे निमंत्रण सुद्धा यावेळी त्यांनी देवेंद्र फडणवीस यांना दिले.

जेबीआयसीचे गव्हर्नर हयाशी नोबुमित्सू यांनी भारत–जपान सहकार्य संबंधात महाराष्ट्रासोबत ईव्ही बसेस, अर्बन मोबॅलिटी या क्षेत्रात एकप्रकारे हरित गुंतवणूकीच्या मोठ्या संधी असल्याचे नमूद केले.

एपी मोलर मर्सेकचे सीईओ विन्सेंट क्लार्क यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत महाराष्ट्रात 2.5 बिलियन डॉलर्स टर्मिनल संधीचे सूतोवाच केले. भारत आणि युरोपियन युनियन सप्लाय चेन कॉरिडॉर याबाबत सुद्धा चर्चा केली.

फिनलंडचे परराष्ट्र व्यापार व्यवहार आणि विकास मंत्री विले त्याविओ यांचीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेत भारत आणि फिनलंडमधील सहकार्यांबाबत चर्चा चर्चा केली. मुंबई येथे मे-जून महिन्यात सर्क्युलर इकॉनॉमीसंदर्भात एक परिषद आयोजित करण्याबाबत सुद्धा यावेळी चर्चा झाली.

इस्रायल इनोव्हेशन अथॉरिटीचे अध्यक्ष अलोन स्टोपेल यांच्याशी विविध नाविन्यपूर्ण संशोधन क्षेत्रात भागीदारीबाबत सविस्तर चर्चा झाली.

हॅवलेट पॅकर्डच्या अध्यक्ष पॅट्रिका रुसो आणि वरिष्ठ उपाध्यक्ष भावना अग्रवाल यांचीही देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली. सुरक्षाविषयक बाबींमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर आणि डिजिटायझेशन इत्यादी बाबत अधिक सहकार्य वाढवण्याबाबत यावेळी चर्चा झाली.

अँटोरा एनर्जीचे सीईओ अँड्रयू पॉनेक यांच्याशी थर्मल एनर्जी साठवणूक सोल्यूशन्स, झिरो कार्बन इंडस्ट्रियल हीट इत्यादींबाबत चर्चा झाली. एमआयटी मीडिया लॅबच्या कार्यकारी संचालक जेसिका रोसेनवर्सेल यांचीही त्यांनी भेट घेतली.

# भविष्यवेध



**रविवार**
**२५ जानेवारी २०२६**

**मेष**
ताजेतवाने वाटू शकते. यश हातातोंडाशी येण्याची शक्यता वाटताना आपली ताकद कमी होत जाण्याची भावना निर्माण होईल. निराशाजनक आर्थिक परिस्थितीमुळे काही महत्त्वाच्या कामामध्ये खंड पडू शकतो.

**वृषभ**
दिवस उत्तम जाईल. आपल्या मित्रांना रात्रीचे जेवण आणि नृत्यासाठी बाहेर घेऊन जाण्यापूर्वी विचार करा. कार्यात यश मिळविण्यासाठी आपले मत ठामपणे मांडा. मित्रांच्या सहाय्याने अनुकूलता वाढेल.

**मिथुन**
व्यापार व प्रणयाच्या क्षेत्रात यश मिळेल. प्रिय व्यक्तीबरोबर संवाद होईल. आवश्यक कार्य देखील पूर्ण होतील. मित्रांचा अनुकूल सहयोग मिळेल. आपल्या आपल्या नातलागांची व मित्रांची चांगली भेट होईल.

**कर्क**
जे लोक बऱ्याच दिवसापासून खूप व्यस्त होते त्यांना आज स्वतःसाठी वेळ मिळू शकतो. वादविवाद किंवा कार्यालयातील राजकारण, तुम्ही या सगळ्याला पुरून उराल. हसत खेळत वेळ खर्च होईल.

**सिंह**
लाभ प्राप्तिचा योग. व्यापारातील आर्थिक त्रासाला संयमाने सोडवच्याचा प्रयत्न करा. निवेश प्रत्याशित.आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये.

**कन्या**
घरगुती कामं बराच काळ व्यस्त ठेवतील. धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. अनियोजित माध्यमातून मिळणारे पैसे तुमचा दिवस उजळून टाकतील.

**तुळ**
जीवनात ध्येयावर लक्ष द्या पूर्ण विश्वासाने त्याच्या प्राप्तीचा प्रयत्न करा.व्यापारात कार्यक्षेत्राचा विकास, व्यापारिक बाधा येऊ शकतात. आय पेक्षा व्यय अधिक असल्याने आर्थिक तंगीची आशंका.

**वृश्चिक**
आपल्या व्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा. आजचा दिवस व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. जुनी कामे झाल्यामुळे उत्साह आणि प्रसन्नता वाटेल.

**धनु**
व्यापार-व्यवसाय सहज राहील. कौटुंबिक सभासदांचा सहयोग मिळेल. यात्रा घडू शकते. अडकलेला पैसा मिळाल्याने आनंद वाटेल. कौटुंबिक चिंता दूर होईल. व्यावसायिक स्थिति चांगली राहील.

**मकर**
बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागेल. आर्थिक विषयांमध्ये सावगिरी बाळगा. सुख-शांतीचे वातावरण राहील. हसत खेळत वेळ खर्च होईल.

**कुंभ**
आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये. आपल्या ्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा. महत्वपूर्ण कार्यांवर व्यय होईल.

**मीन**
तटस्थ भूमिका घेणे, प्रगतिवर्धक बातम्या मिळतील. मुलांची उन्नति प्रसन्नता देईल. आधी केलेल्या कामाचे फळ मिळेल. बिघडलेले संबंध सुधारतील.नवीन जोखिम असलेली कार्ये टाळा.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/



माघी गणेशोत्सवानिमित्त साई चौक, कल्याण (पश्चिम) येथिल कल्याणच्या राजाचे दर्शन



बदलापूरमधील स्टेशनपाडा परिसरातील बदलापूर राजाच्या दर्शनासाठी गणेशभक्तांच्या लांबचलांब रांग लागल्या होत्या.

# लोकशाहीचा उत्सव, रस्ते सुरक्षा आणि 'R.E.A.C.H.' मंत्र

## एक जबाबदार नागरिक म्हणून माझा जागर

नमस्कार,
रसिक आणि जागरूक ठाणेकर नागरिक मित्रांनो...!

आज २५ जानेवारी २०२६. अवघ्या तीन दिवसांपूर्वी, २२ जानेवारीला माझ्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त, आपण सर्वांनी मिळून 'रस्ते सुरक्षा ही प्रत्येकाची जबाबदारी' या मोहिमेचा श्रीगणेशा केला. त्या दिवशी ७८ रस्ते सुरक्षा चिन्हांचे पोस्टर आणि १५ लघुकथांच्या माध्यमातून आपण प्रबोधनाचा जो प्रवास सुरू केला, तो आज एका महत्त्वाच्या वळणावर येऊन पोहोचला आहे. आज आहे 'राष्ट्रीय मतदार दिवस' (National Voters' Day).

खिडकीबाहेरच्या बागेतली झाडं सकाळच्या कोवळ्या उन्हात न्हाऊन निघत आहेत आणि माझ्या टेबलावर माझं 'मतदार ओळखपत्र' अभिमानाने चमकतंय. या कार्डाकडे पाहताना मला आज आपल्या लाडक्या पु.ल. देशपांडे यांच्या शैलीत, एका 'कॉमन मॅन'च्या नात्याने तुमच्याशी गप्पा माराव्याशा वाटतायत. अहो, हे नुसतं प्लास्टिकचं कार्ड नाही, हे तर लोकशाहीच्या महामार्गावर चालण्याचं आपलं 'ड्रायव्हिंग लायसन्स' आहे!

ठाणे जिल्हा माहिती कार्यालय (DIO ठाणे) आणि VesacIndia यांच्या संयुक्त विद्यमाने आम्ही एक नवा सेतू बांधत आहोत — "प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दुवा". हा दुवा मजबूत करण्यासाठी आणि २२ जानेवारीपासून सुरू झालेली आमची सुरक्षा मोहीम पुढे नेण्यासाठी, मी आज आपल्या R.E.A.C.H. या पंचसूत्रीचा आधार घेणार आहे.

### १. 'R' - Responsibility (उत्तरदायित्व): रस्ते सुरक्षा आणि मतदानाचा अधिकार

लोकशाहीत 'हक्क' सगळ्यांना हवे असतात, पण 'कर्तव्य' म्हटलं की लोक 'चिंचवडच्या लोकल'सारखे लांब पळतात! पुलांच्या भाषेत सांगायचं तर, "हक्क म्हणजे दुधावरची साय, आणि कर्तव्य म्हणजे ते दूध तापवण्यासाठी सोसावी लागणारी झळ."

२५ जानेवारी १९५० रोजी आपल्या 'भारतीय निवडणूक आयोगाची' (ECI) स्थापना झाली. उद्या आपण प्रजासत्ताक होणार होतो, पण त्या आदल्या दिवशीच आपण ठरवलं की या देशाचा 'धनी' हा सामान्य माणूस असेल. हे किती मोठं उत्तरदायित्व आहे! पण हे उत्तरदायित्व फक्त मतदानापुरतं मर्यादित नाही.

२२ जानेवारीला आपण जो संकल्प केला तो आठवा— रस्त्यावर चालताना रहदारीचे नियम पाळणं (Road Safety) ही जशी जबाबदारी आहे, तसंच योग्य प्रतिनिधी निवडण्यासाठी मतदान करणं ही सुद्धा जबाबदारी आहे. जो नागरिक 'नो एन्ट्री' मध्ये गाडी घालत नाही, तोच नागरिक लोकशाहीत 'चुकीच्या प्रवृत्तींना' एन्ट्री नाकारू शकतो. जबाबदार नागरिक होणं हीच खऱ्या लोकशाहीची सुरुवात आहे.

### २. 'E' - Empathy (सहानुभूती): सुरक्षा आणि निसर्गाचे नाते

मतदान केंद्रावरच्या त्या रांगेत उभा राहिलो की मला खऱ्या भारताचं दर्शन होतं. तिथे 'चितळे' आणि 'पाटील' एकाच रांगेत असतात. सहानुभूती म्हणजे काय? तर दुसऱ्याच्या वेदनेशी स्वतःला जोडून घेणं.

VesacIndia च्या माध्यमातून आम्ही जेव्हा वृक्षारोपण करतो किंवा रस्ते सुरक्षेचे धडे देतो, तेव्हा त्यामागे हीच भावना असते. रस्त्यावर हेल्मेट न घालणाऱ्या तरुणाला पाहून मला त्याच्या घरी वाट पाहणाऱ्या आईची काळजी वाटते, ही 'एम्पथी' आहे. निसर्गाच्या बाबतीतही हेच आहे; मी आज जे झाड लावतोय, त्याचं फळ कदाचित मला मिळणार नाही, पण पुढच्या पिढीला सावली मिळेल. प्रशासनासोबत काम करताना, अधिकाऱ्यांच्या अडचणी समजून घेणं आणि त्यांना सहकार्य करणं, हाच नागरिक आणि शासन यांच्यातील मजबूत दुवा आहे.

### ३. 'A' - Awareness (जागरूकता): तंत्रज्ञान आणि ज्ञानाचा प्रकाश

"अहो कट्टी साहेब, आजकाल सगळं डिजिटल झालंय हो!" माझा एक मित्र सांगत होता. खरंच आहे, २०२६ मध्ये आपण 'डिजिटल इंडिया'च्या शिखरावर आहोत. आज 'व्होटर हेल्पलाईन ॲप'वर एका क्लिकवर नाव नोंदणी होते. पण खरी जागरूकता म्हणजे केवळ तंत्रज्ञान नव्हे, तर 'माहिती' असणे.

ज्याप्रमाणे २२ जानेवारीच्या उपक्रमात आपण ७८ रस्ते चिन्हांची माहिती दिली, तशीच माहिती आपल्याला आपल्या निवडणूक प्रक्रियेबद्दल असायला हवी. आपले अधिकार काय? आपला उमेदवार कोण? आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरणाचे प्रश्न शासन कशा प्रकारे सोडवत आहे? जिल्हा माहिती कार्यालयाच्या (DIO) माध्यमातून मिळणारी ही शासकीय माहिती तळागाळापर्यंत पोहोचवणं, हीच खरी जागरूकता. जागरूक मतदार हा कधीच अपघाताचा (राजकीय किंवा रस्ते अपघात) बळी ठरत नाही!

### ४. 'C' - Compassion (करुणा): माणुसकीची वीण

निवडणूक प्रक्रिया ही केवळ कोरडी आकडेवारी नाही, ती जिवंत माणसांचा उत्सव आहे. मतदान केंद्रावर जेव्हा मी एखादा तरुण स्वयंसेवक एखाद्या दिव्यांगाला किंवा थकलेल्या आजींना मदत करताना पाहतो, तेव्हा मला तिथे करुणा दिसते.

आमच्या मोहिमेत, मग ते 'रस्ते सुरक्षा' असो किंवा 'वृक्षारोपण', आम्ही नेहमीच करुणेला प्राधान्य देतो. अपघाताच्या वेळी जखमीला मदत करणं (Golden Hour) ही 'करुणा' आहे. २०२५-२६ मध्ये निवडणूक आयोगाने ज्येष्ठ नागरिकांसाठी 'होम व्होटिंग'ची जी सोय केली आहे, त्यामागे हीच मानवी संवेदना आहे. ही करुणाच आपल्याला शासनाशी आणि समाजाशी अधिक घट्ट जोडते.

### ५. 'H' - Harmony (सुसंवाद): सुरक्षित आणि समृद्ध समाज

शेवटी सर्वात महत्त्वाचं म्हणजे सुसंवाद. निवडणुका येतात आणि जातात, रस्ते बनतात आणि खराब होतात, पण समाज टिकला पाहिजे. पुलांच्या साहित्यात जसा विविध पात्रांचा मेळ होता, तसाच मेळ आपल्या समाजात असावा. सुरक्षा (Safety), आरोग्य (Health), पर्यावरण (Environment) आणि मतदान या विषयांवर जेव्हा नागरिक आणि शासन 'समन्वयाने' (Harmony) काम करतात, तेव्हाच राष्ट्र समृद्ध होतं. मतभेद असावेत, पण मनभेद नसावेत. हाच सुसंवाद आपल्याला एक आदर्श राष्ट्र बनवेल.निष्कर्ष काय तर सुरक्षित लोकशाहीचा संकल्प....!

तर ठाणेकर मंडळी, २२ जानेवारीला सुरू झालेला रस्ते सुरक्षेचा हा पंधरवडा आणि आजचा हा मतदार दिन, हे दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एक आपल्याला 'जगायला' शिकवतो, तर दुसरा आपल्याला 'कसं जगायचं' हे ठरवायला शिकवतो.

जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे आणि VesacIndia यांच्या या संयुक्त उपक्रमात सामील व्हा. रस्त्यावर नियम पाळा (कारण जीव अमूल्य आहे), झाडे लावा (कारण श्वास आवश्यक आहे) आणि जेव्हा मतदानाची वेळ येईल, तेव्हा 'निर्भयपणे' आपला हक्क बजावा (कारण देश तुमचा आहे). २२ जानेवारीला घेतलेला सुरक्षिततेचा वसा आणि आज घेतलेला मतदानाचा संकल्प, येणाऱ्या पिढ्यांचं भविष्य ठरवेल. अभिमानाने म्हणा - 'मी जबाबदार नागरिक, मी सुरक्षित मतदार!'

**- विजयकुमार कट्टी**
**(Tree Man of Thane & Founder, VesacIndia)**
**जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे यांच्या सहकार्याने.....**

# महाराष्ट्राच्या ले. कर्नल सीता शेळके यांना 'सुभाषचंद्र बोस आपत्ती व्यवस्थापन पुरस्कार' जाहीर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी दिल्ली, 23** :आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात शौर्य आणि तांत्रिक कौशल्याचा सुयोग्य वापर करणा-या अहिल्यानगरच्या सुकन्या लेफ्टनंट कर्नल सीता अशोक शेळके यांना भारत सरकारचा मानाचा 'सुभाषचंद्र बोस आपत्ती व्यवस्थापन पुरस्कार 2026' जाहीर झाला आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीचे औचित्य साधून (पराक्रम दिवस)आज केंद्र सरकारने ही घोषणा केली. देशभरातून आलेल्या 271 नामांकनांतून ले.कर्नल शेळके यांची वैयक्तिक श्रेणीसाठी निवड झाली आहे.

### वायनाड बचाव मोहिमेतील शौर्य आणि इंजिनीअरिंगचा चमत्कार

लेफ्टनंट कर्नल सीता शेळके यांनी 2024 मध्ये केरळमधील वायनाड येथे झालेल्या भीषण भूस्खलनादरम्यान बजावलेली कामगिरी या पुरस्कारासाठी निर्णायक ठरली. जेव्हा वायनाडमध्ये निसर्गाचे थैमान




सुरू होते, तेव्हा त्यांनी अत्यंत प्रतिकूल हवामानात शेकडो नागरिकांचे प्राण वाचवण्यासाठी बचाव मोहिमेचे नेतृत्व केले. त्यांच्या कार्याचा सर्वात मोठा टप्पा म्हणजे चूरलमाला येथील 190 फूट लांबीच्या बेली ब्रिजची विक्रमी वेळेत केलेली उभारणी. या पुलामुळे संपर्क तुटलेल्या दुर्गम गावांशी पुन्हा संवाद प्रस्थापित झाला आणि मदतकार्य पोहोचवणे शक्य झाले. इतकेच नव्हे तर, कोमात्सु PC210 एक्सकॅव्हेटरचा कल्पक वापर करून त्यांनी अवघ्या चार तासांत तात्पुरता पादचारी पूल तयार केला होता. त्यांच्या या विलक्षण इंजिनीअरिंग कौशल्यामुळे मदतकार्याला मोठी गती मिळाली. प्रत्यक्ष कार्यासोबतच त्यांनी आतापर्यंत 2,300 हून अधिक जवानांना आपत्ती निवारणाचे विशेष तांत्रिक प्रशिक्षणही दिले आहे.

### गाडीलगाव ते भारतीय लष्कर: एक प्रेरणादायी परिचय

अहिल्यानगर जिल्ह्यातील गाडीलगाव येथील रहिवासी असलेल्या सीता शेळके यांचा लष्करापर्यंतचा प्रवास जिद्दीचा आहे. त्यांचे वडील अशोक भीकाजी शेळके हे पेशाने वकील आहेत. सीता यांनी आपले मेकॅनिकल इंजिनीअरिंगचे शिक्षण अहिल्यानगरमधूनच पूर्ण केले. सुरुवातीला पोलीस दलात जाण्याचे स्वप्न पाहणाऱ्या सीता यांनी नंतर देशसेवेसाठी लष्कराची निवड केली.आपल्या मेहनतीच्या जोरावर त्यांनी अत्यंत कठीण समजली जाणारी एसएसबी (SSB) परीक्षा उत्तीर्ण केली आणि 2012 मध्ये चेन्नई येथील ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडमीतून प्रशिक्षण पूर्ण करून त्या भारतीय लष्करात अधिकारी म्हणून रुजू झाल्या आहेत.

# आगरी महोत्सव अनुदानासाठी साकडे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : आगरी परंपरा व संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या भिवंडी आगरी महोत्सवासाठी राज्य सरकारच्या सांस्कृतिक विभागाने अनुदान द्यावे, अशी मागणी भिवंडी आगरी महोत्सवाच्या आयोजकांनी केली. तालुक्यातील सोनाळे येथील मैदानावर भिवंडी आगरी महोत्सवाचे आयोजन २४ ते २८ जानेवारी असे पाच दिवसांसाठी केले आहे. आयोजनाची माहिती देण्यासाठी आयोजन समितीचे विशूभाऊ म्हात्रे, पंडित पाटील, यशवंत सोरे, ओम मुकादम उपस्थित होते.

# डोंबिवलीत फेरीवाल्यांचा प्रश्न पुन्हा चर्चेत

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : डोंबिवलीतील एका तरुणीच्या इंस्टाग्राम पोस्टमुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत मोठी हालचाल पाहायला मिळाली. डोंबिवली स्टेशन परिसरात शोरमा गाडी चालवणाऱ्या एकता सावंत या तरुणीवर केडीएमसीने केलेल्या कारवाईविरोधात तिने सोशल मीडियावर आपली व्यथा मांडत न्यायाची मागणी केली होती. फेरीवाले व परप्रांतीय विक्रेत्यांवर कारवाई होत नसताना स्थानिक तरुणीवरच कारवाई केली जात असल्याचा आरोप या तरुणीने आपल्या पोस्टमध्ये केला होता. ही पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होताच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी याची थेट दखल घेत मनसैनिकांना या प्रकरणाकडे लक्ष देण्याचे आदेश दिले.

राज ठाकरे यांच्या आदेशानंतर मनसेचे नेते अविनाश जाधव थेट डोंबिवलीत दाखल झाले. त्यांनी संबंधित तरुणीची भेट घेऊन तिची व्यथा ऐकून घेतली. उद्यापासून टपरी लावून काम सुरू कर, मनसे तुझ्या पाठीशी आहे, असा शब्द अविनाश जाधव यांनी तरुणीला दिला. तसेच या प्रकरणी केडीएमसी आयुक्तांशी चर्चा करण्यात येणार असून, संबंधित ठिकाणी मनसेचे पदाधिकारी तैनात असतील, असे आश्वासनही अविनाश जाधव यांनी दिले.

## तरुणीचे प्रशासनावर आरोप

या घटनेमुळे डोंबिवलीत स्थानिक व्यापाऱ्यांच्या प्रश्नांवर पुन्हा एकदा चर्चा रंगली असून, महापालिकेच्या कारवाईच्या धोरणावरही सवाल उपस्थित होत आहेत.

कारवाईचा बडगा फक्त मराठी फेरीवाल्यांना का? परप्रांतीय फेरीवाल्यांना अभय कुणाचे, प्रशासन फेरीवाला ना फेरीवाला क्षेत्राची प्रभावी अमंलबजावणी कधी करणार अशा खमंग चर्चा यानिमित्ताने जनसामान्यांत रंगल्या असल्याचे चित्र दिसत होते.

# कळवा राखीव वनात अवैध विटा पुरवठा | चालकास अटक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : कळवा परिसरात राखीव वन क्षेत्रावर बेकायदा अतिक्रमणासाठी बांधकाम साहित्याचा पुरवठा केला जात असल्याची माहिती मिळताच वन विभागाने तातडीने कारवाई करत टेम्पो जप्त केला. या कारवाईत चालकाला अटक केली.

मौजे कळवा (घोलई नगर) येथील राखीव वन क्षेत्रातील गट क्रमांक ९७/अ मध्ये विटांचा अवैध पुरवठा सुरू असल्याची माहिती वन विभागाला मिळाली होती. त्यानुसार ठाणे वन परिक्षेत्र अधिकारी नरेंद्र मुठे यांच्या मार्गदर्शनात विशेष पथक तयार करून सापळा रचण्यात आला. कळवा वन परिमंडळातील वनपाल संदीप सीताराम मोरे यांच्या नेतृत्वात पथकाने कारवाई करत बांधकाम साहित्य घेऊन जाणारा टेम्पो रंगेहाथ पकडला. तपासात विटा राखीव वन क्षेत्रात अतिक्रमणासाठी वापरल्या जाणार असल्याचे निष्पन्न झाले. चालक कमलेश विश्वकर्मा याला अटक केली. न्यायालयाने त्याला दोन दिवसांची कोठडी सुनावली. या कारवाईत वन परिमंडळ अधिकारी प्रवीण आव्हाड, वनरक्षक तुषार कळोखे, कृष्णा पोले, जितेंद्र देशमुख, सुनील गावित यांनी सहभाग घेतला

# आधारवाडी डंपिंग ग्राउंडवरील बायोमायनिंग प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला सुरुवात

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महापालिकेच्या आधारवाडी डंपिंग ग्राउंडवरील बायोमायनिंग प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामाला सुरुवात करण्यात आली आहे. या टप्प्यात सुमारे ९ लाख मेट्रिक टन कचऱ्याचा ढीग बायोमायनिंग पद्धतीने प्रक्रिया करून संपूर्ण क्षेत्र मोकळे करण्याच्या महत्त्वाकांक्षी कामाला सुरुवात झाली असल्याची माहिती महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी दिली आहे. तसेच या कचऱ्याचे प्रमाण पाहता अतिरिक्त मशिनरी तसेच मनुष्यबळाच्या माध्यमातून कामाचा वेग वाढवण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.



महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आज घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त रामदास कोकरे यांच्यासमवेत कल्याणमधील आधारवाडी डंपिंगसह उंबर्डे, बारावे आणि डोंबिवलीतील महापालिकेच्या ओला - सुका कचरा व्यवस्थापन प्रकल्पांची आज पाहणी केली. यावेळी कार्यकारी अभियंता जयवंत विश्वास आणि विविध प्रकल्पाचे ठेकेदार उपस्थित होते.

आधारवाडी डंपिंग ग्राउंडवर कोविड काळातच कचरा टाकणे बंद करण्यात आले असून बायोमायनिंग पद्धतीच्या माध्यमातून हा कचऱ्याचा डोंगर रिकामा करण्यात येत आहे. या कामातून आतापर्यंत हजारो मेट्रिक टन कचऱ्याचे वर्गीकरण करण्यात यश आले असून या प्रक्रियेतून तयार होणारे नाकारलेले इंधन सिमेंट कारखान्यांना पुरवण्यात येत आहे. चाळून प्राप्त झालेली माती महापालिकेच्या प्रस्तावित नागरी प्रकल्पांच्या लँडफिलिंगसाठी वापरण्यात येणार आहे. इतकेच नाही तर डंपिंग ग्राउंड पूर्णपणे रिकामे झाल्यानंतर दुर्गाडी ते बारावे असा प्रस्तावित रिंग रोडचा टप्पा पूर्ण करण्याचा मार्गही मोकळा होणार आहे.कल्याण-डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त रामदास कोकरे यांच्यासह आधारवाडी डंपिंग ग्राउंडवरील कामाची पाहणी केली. पाहणीनंतर त्यांनी प्रकल्पाबाबत माहिती देताना सांगितले की, पुढील ६ ते ८ महिन्यांत हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच कामाचा वेग वाढावा यासाठी अधिक मशिनरी आणि मनुष्यबळ वाढवण्याच्या सूचनाही

### पुढील 6-8 महिन्यात प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट तर शहरातील कचरा वर्गीकरणही पोहोचले 450 टनांवर

यावेळी आयुक्त गोयल यांच्याकडून देण्यात आल्या आहेत. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर उरलेली मोकळी जागा सिटी ब्युटिफिकेशन, उद्याने (पार्क) किंवा नागरिकांसाठी इतर सार्वजनिक सुविधाही विकसित करण्यासाठी वापरण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.आयुक्त अभिनव गोयल यांनी आधारवाडी डंपिंगनंतर उंबर्डे येथील ओला कचरा आणि बारावे येथील सुका कचरा प्रकल्पांनाही भेट दिली. त्यावेळी बारावे येथील सुका कचरा व्यवस्थापन प्रकल्पामध्ये येणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण तिपटीने वाढले असल्याची महत्त्वपूर्ण बाब त्यांच्या निदर्शनास आली. बारावे प्रकल्पाची क्षमता 200 टन इतकी असून नागरिकांकडून कचरा वर्गीकरण वाढले असल्याने 150 टन प्रतिदिन कचरा याठिकाणी येत असल्याचे सांगत त्यांनी शहरातील नागरिकांचे विशेष कौतुक केले. तसेच हा कचरा नसून ते सोने आहे,याठिकाणी येणाऱ्या कचऱ्यातून निघणारे रिफ्युज फ्युएल हे सिमेंट तसेच प्लॅस्टिक फॅक्टरीना देण्यात येत आहे. ज्याद्वारे आपण आपले शहर तर सुंदरच ठेवण्यासोबतच पर्यावरण रक्षणामध्येही महत्त्वाची भूमिका बजावत आहोत. त्यामुळे नागरिकांनी सर्व प्रकारचा कचरा अधिकाधिक प्रमाणात वर्गीकरण करून देण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.





ठाणे ■ रविवार

२५ जानेवारी २०२६

दैनिक ठाणे

जीवनदीप वार्ता

पान ४


# प्री-प्रायमरी शाळांसाठी मान्यता बंधनकारक – आ. ज्ञानेश्वर म्हात्रे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे(प्रतिनिधी) :** नुकत्याच बदलापूर या ठिकाणी प्री-स्कूलमध्ये शिकणाऱ्या लहान बालिकेवर व्हॅन चालक नराधमाने लैंगिक अत्याचार केल्याची घृणास्पद घटना घडलेली आहे. या घटनेमुळे समाजामध्ये शिक्षण विभागाविषयी प्रचंड नाराजी व असंतोष पसरलेला आहे. इयत्ता पहिली ते पुढील शिक्षणाकरिता शालेय शिक्षण विभागाकडून शाळांना मान्यता दिली जाते. मात्र प्री स्कूलमध्ये शिक्षण देणाऱ्या शाळांना शासनाकडून कोणत्याही प्रकारची शासन मान्यता दिली जात नाही. त्यामुळे त्या शाळांवर कोणाचेही अंकुश राहत नाही. राज्यातील पूर्व प्राथमिक शाळांना विद्यार्थ्यांचे सुरक्षेसाठी मान्यता घेणे बंधनकारक करावे व विद्यार्थी सुरक्षेसाठी काटेकोर नियमावली लागू करावी अशी मागणी शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना पत्राद्वारे केली आहे.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार या वर्षापासून तीन ते पाच वर्षे वयोगटातील लहान मुलांसाठी पूर्व प्राथमिक म्हणजे प्री - स्कूलच्या वर्गांना आराखड्यामध्ये मान्यता घेणे बंधनकारक असल्याचे म्हटले आहे. त्यानुसार राज्यातील अनेक प्री स्कूल यांनी जून 2025 मध्ये मान्यता मिळण्यासाठी शाळेची सर्व माहिती ऑनलाईन स्वरूपात भरलेली आहे. त्यामुळे राज्यातील प्री स्कूलला तात्काळ मान्यता देण्याची कार्यवाही करावी व सर्व नियम, विद्यार्थी सुरक्षा यांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आदेशित करावे तसेच परिवहन खात्याकडून विद्यार्थी ने -आण करणाऱ्या प्रत्येक वाहनास परवानगी घेतल्याशिवाय विद्यार्थी वाहतुकीस मान्यता देऊ नये व अनधिकृत वाहने असल्यास त्यांच्यावर त्वरित कारवाई करावी असे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी पत्रात म्हटले आहे.

## भिवंडी आगरी महोत्सवासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी तालुक्यातील सोनाळे येथे आजपासून २८ जानेवारीपर्यंत भिवंडी आगरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. आगरी समाजाची परंपरा व संस्कृती जपणाऱ्या या महोत्सवासाठी राज्य शासनाच्या सांस्कृतिक विभागाने अनुदान द्यावे, अशी मागणी आयोजकांनी केली आहे. महोत्सवाचे उद्घाटन आज सायंकाळी वारकरी संप्रदायाच्या पालखी व रिंगण सोहळ्याने होणार असून क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम व मान्यवरांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

## पत्रकार अवधुत सावंत यांना ‘राष्ट्रज्योत पुरस्कार’



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

जे एम एफ’ च्या रजत जयंती महोत्सवात राष्ट्रीय पदक विजेता पत्रकार तथा केंद्रीय पत्रकार संघाचे संघटक तसेच ”महाराष्ट्र पोलीस न्यूज” चे क्राईम रिपोर्टर अवधुत सावंत यांना त्यांच्या पत्रकारितेतील उल्लेखनीय कामगिरी बद्दल राष्ट्रज्योत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले

## दिव्यातील पूर्वेकडील मध्य रेल्वेचे तिकीटघर मध्यरात्रीपर्यंत खुले ठेवावे अशी प्रवाशांची मागणी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**दिवा :** दिवा रेल्वे स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वेगाने वाढत असून दिवा शहराची ९० टक्क्यांपेक्षा जास्त लोकवस्ती पूर्वेला आहे. असे असूनही या स्थानकातील पूर्वेचे तिकीटघर रात्री नऊ वाजता बंद होत असल्याने त्यानंतर प्रवाशांना तिकीट काढण्यासाठी पश्चिमेला जावे लागते.

मात्र पश्चिमेला असणारे तिकीटघर हे मुंबई दिशेकडे असल्याने प्रवाशांना पायपीट करावी लागते. यामुळे रात्रीच्या वेळेस विशेषतः महिलांना त्रास होत असल्याने पूर्वेचे तिकीटघर मध्यरात्रीपर्यंत सुरू ठेवावे, अशी मागणी दिवा रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष ॲड. आदेश भगत यांनी रेल्वे प्रशासनाकडे केली आहे.

## भिवंडी मनपाचे अधिकारी झळके यांचे आईचे 100 वर्षी निधन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी शहरातील कोंबडपाडा येथील जुने रहिवासी महानगरपालिकेचे सेवानिवृत्त सहाय्यक आयुक्त सुभाष (नाना) धाऊ झळके व सुनील धाऊ झळके यांच्या मातोश्री सुंदराबाई धाऊ झळके यांचे वयाच्या १०० व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.आहे. त्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात असुन त्यांच्या पार्थिव देहावर अजय नगर रोडवरील हिंदू चिरशांती स्मशानभूमीत शोकाकुल वातावरण रात्री उशिरा शोकाकुल वातावरण अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी शहरातील मान्यवर नागरिकासह विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच पालिकेचे कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शहरातील कोंबडपाडा येथे राहणारे**

पालिकेत सहाय्यक आयुक्त पदावर काम करणारे सुभाष (नाना) धाऊ झळके व सुनील धाऊ झळके हे पहिल्या पासुन सामाजिक कार्यात सक्रियपणे काम करीत आहेत. अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांच्या आईने त्यांचे संगोपन करून महापालिकेत नोकरीला लावले.आई ची अंतिम श्वासापर्यंत त्यांनी सेवा केली अखेर त्यांच्या आई ने 100 वर्षी दुःखद निधन झाले आहे त्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# स्वच्छ शहरासाठी विद्यार्थी-नागरिकांचा सहभाग गरजेचा – उपायुक्त कोकरे



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** रेल चाइल्ड संस्था संचलित महात्मा गांधी विद्यामंदिर प्राथमिक शाळा डोंबिवली (प) येथे मुख्याध्यापक अजय कुमार जोगी यांच्या संकल्पनेतून वसंत पंचमी निमित्त स्वच्छतेचे वाण या उपक्रमांतर्गत महिला पालकांसाठी हळदीकुंकू व तिळगुळ समारंभाचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कल्याण डोंबिवली महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त रामदास कोकरे उपस्थित होते. तसेच शाळा समिती सदस्य नितीन मांडे, केंद्र शाळा प्रमुख उदयभान गुप्ता उपस्थित होते.

संत गाडगेबाबा यांच्या 150 व्या जयंतीचे औचित्य साधत रामदास कोकरे यांचा शाल श्रीफळ सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन यथोचित गौरव करण्यात आला. विद्यार्थी व पालकांचा सर्वांना स्वच्छतेची प्रतिज्ञा देण्यात आली. आठवड्यातून दोन तास श्रमदान करून स्वच्छतेच्या संकल्पनेला साकार करण्याचे आवाहन शाळेतर्फे करण्यात आले.

शाळेतील स्वच्छता दूत त्यांच्या योगदानाबद्दल त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच माझी शाळा स्वच्छ शाळा या उपक्रमांतर्गत ज्या पालकांनी शाळा स्वच्छ करण्यासाठी आपले योगदान दिले त्या सर्व पालकांचा प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. प्रमुख पाहुणे कोकरे यांनी आपल्या भाषणात स्वच्छतेची त्रिसूत्री विद्यार्थी व पालकांना सांगून स्वच्छ व सुंदर शहरासाठी विद्यार्थ्यांचा नागरिकांचा सक्रिय सहभाग असणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व समजावून सांगितले. कोरोना काळामध्येमा. मुख्याध्यापक अजय कुमार जोगी यांच्या नेतृत्वात पथनाट्य सादर करून कल्याण मधील डम्पिंग ग्राउंड कायमस्वरूपी बंद केले याची आठवण कोकरे यांनी त्यांच्या भाषणातून करून दिली.स्वच्छतेचे संदेश देण्यासाठी महिला पालकांसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच विद्यार्थी व शिक्षकांनी तयार केलेले स्वच्छते संबंधित पोस्टर्स व चित्रे हे दर्शनी भागात लावण्यात आले होते . छोट्या बाल वैज्ञानिकांनी तयार केलेले घनकचरा व्यवस्थापनासाठी स्वयंचलित कचराकुंडीचे प्रात्यक्षिक सर्वेज्ञ पेडणेकर व वैभव चौधरी या विद्यार्थ्यांनी उपायुक्त कोकरे यांना दाखवले. या आगळ्यावेगळ्या तिळगुळ समारंभाचे वैशिष्ट्य म्हणजे स्वच्छतेचे वाण सर्व पालकांना देण्यात आले. महिला पालकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ललिता कुलकर्णी यांनी केले.

# ज्ञानोत्सवातून विद्यार्थांचे सुप्त गुणांना मिळाला वाव




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध स्पर्धांच्या माध्यमातून सुप्त गुणांना वाव मिळून त्यांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने ज्ञानोदय शिक्षण प्रसारक समिती संचलित ज्ञानोदय बी एस्सी आयटी कॉलेज व बी.एड. कॉलेज ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे अध्यक्ष प्रा. प्रेम तिवारी यांचे मार्गदर्शनाखाली ज्ञानोत्सव 2026 चे दि.22 व 23 जानेवारी 2026 रोजी ज्ञानोदय विद्यामंदिर, सावरकर नगर, ठाणे येथे आयोजन करण्यात आले होते. या ज्ञानोत्सवामध्ये 18 विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या सर्व स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत आपली गुणवत्ता, सर्जनशीलता आणि आत्मविश्वासाचे प्रभावी दर्शन घडवले.

या उपक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कोकण विभाग पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजनजी डावखरे, नगरसेवक अमित सरैय्या, संस्थेचे सचिव आर. एन. तिवारी, पत्रकार अर्जुन चेमटे, लालबहादूर शास्त्री विद्यालयाचे संस्थापक वीरेंद्र यादव तसेच संस्थेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

ज्ञानोत्सवाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली.यावेळी कोकण विभाग पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजनजी डावखरे, नगरसेवक अमित सरैय्या, संस्थेचे सचिव आर. एन. तिवारी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंकित तिवारी, बी.एस्सी आय टी प्रभारी प्राचार्या शिनू तिवारी, विभाग प्रमुख जेबा नदार, बीएड कॉलेज प्राचार्या स्मिता मेस्त्राम , विभाग प्रमुख अस्मिता जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मातोश्री महाविद्यालयात सूर्यनमस्कार व करियर गायडन्स मार्गदर्शन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** शहाड येथील मातोश्री वेलबाई देवजी हरिया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि आरोग्य योगा व नॅचरोपॅथी इन्स्टिट्यूट, बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २२ व २३ जानेवारी रोजी सूर्यनमस्काराचे आयोजन करण्यात आले होते.

भारतीय संस्कृतीमध्ये प्राचीन काळापासून सूर्य उपासनेला महत्त्वाचे स्थान आहे. सूर्य हा चराचर सृष्टीचा आत्मा आहे. सूर्य उपासनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शारीरिक सुदृढतेबरोबरच मानसिक स्वास्थ्य कसे राखावे यासंदर्भात प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या आधारे आरोग्य योगा व नॅचरोपॅथी इन्स्टिट्यूटच्या सायली जाधव व सोनल झाडे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.कविता मांजे व प्रा. सुनंदा शिंदे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. चिंतामण भोईर, समाजसेवक डॉ. गिरीश लटके व शाहू शिक्षण संस्था शहाडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. सूर्यकांत भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

तसेच कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी बारावी नंतरचे करिअर मार्गदर्शन व शैक्षणिक संधींसंदर्भात मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन वरिष्ठ महाविद्यालयामार्फत करण्यात आले. याप्रसंगी प्रा. राजेश यादव व प्रा.के. डी. शिंदे यांनी शिक्षणाच्या विविध संधी व शिष्यवृत्त्यांसंदर्भात माहिती दिली. वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक विभागामार्फत आयोजित केल्या गेलेल्या विविध कार्यक्रमाच्या उद्बोधनपर चित्रफिती दाखवण्यात आल्या. या कार्यक्रमासाठी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. कल्पना सोमनाचे, वरिष्ठ महाविद्यालयाच्या डॉ. अलका शिंदे, प्रा.प्रभाकर गांगुर्डे, प्रा. सविता पाटील, प्रा.संगिता सोमैया, प्रा.रेणूका शिंदे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्र निवेदन प्रा. पूजा झा यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. कविता मांजे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ.चिंतामण भोईर यांचे मार्गदर्शन लाभले.

## मुरबाड तिन हात नाका : राष्ट्रध्वज परिसर स्वच्छतेची नागरिकांकडून मागणी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** मुरबाड तिन हात नाक्यावर तिरंगा चौक येथे उभारलेल्या 135 फुट भव्य अशा राष्ट्रध्वजा सभोवती अतिक्रमण झाले असून तिथे कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे.या राष्ट्रध्वजाची निगा, दुरुस्ती, देखभाल सध्या मुरबाड नगरपंचायत करत आहे. परंतू प्रजासत्ताक दिन जवळ येऊन सुद्धा नगरपंचायतीचे याकडे दुर्लक्ष झाले असल्याने नागरिकांनी याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.

मुरबाड शहराच्या मुख्य ठिकाणी तीनहात (तिरंगा चौक) येथे आपल्या भारत देशाचा राष्ट्रध्वज ( तिरंगी झेंडा ) उंची 135 फूट मोठ्या थाटामाटात बसवण्यात आला आहे, मात्र आज मितीस पाहिलं तर तिरंगी चौकात सर्व ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरले आहे, तसेच स्तंभावर तिरंगी झेंडा सुद्धा नाही, या परिसरातील तात्काळ स्वच्छता करण्यात यावी व आपल्या भारत देशाचा तिरंगी झेंडा राष्ट्रध्वज तात्काळ बसवण्यात यावा तसेच तात्काळ स्वच्छता करण्यात यावी अन्यथा आम्ही या परिसरातील स्वच्छता करू, तसेच हा राष्ट्रध्वज कायमस्वरूपी फडकत असावा, परिसरात कायमस्वरूपी स्वच्छता असावी, राष्ट्रध्वजाची कायमस्वरूपी या चौकाची निगा राखण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पक्षाचे तालुका अध्यक्ष दिपक वाघचौरे यांनी मुरबाडचे तहसीलदार व मुख्याधिकारी यांना सोशल माध्यमातून केलेल्या निवेदनात केली आहे.

# दिव्यात आशेची किरणे उगवत ठाणे महापौरपदासाठी दिपक जाधव यांचे नाव आघाडीवर



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**दिवा :** महानगरपालिकेचे महापौर पद अनुसूचित जाती (एस सी) साठी आरक्षित झाल्यानंतर राजकीय वर्तुळात हालचालींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर दिवा प्रभाग समितीतील प्रभाग क्रमांक २८ मधील एस सी आरक्षित जागेतून सलग दुसऱ्यांदा निवडून आलेले नगरसेवक दिपक जाधव यांचे नाव महापौरपदासाठी आघाडीवर असल्याची चर्चा सुरू झाली आहे. दिपक जाधव हे माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांचे निकटवर्तीय मानले जातात. महापालिकेतील अनुभव, संघटनात्मक ताकद आणि स्थानिक पातळीवरील सक्रिय कामकाजामुळे ते पक्षातील विश्वासू चेहरा म्हणून ओळखले जातात. दिवा–शीळ विभागातून शिवसेनेचे १० तर भाजपचा १ नगरसेवक निवडून आल्याने या विभागात शिवसेना भक्कम स्थितीत असल्याचे चित्र आहे. दिव्यातील २७,२८ आणि २९ हे प्रभाग शिवसेनेचा बालेकिल्ला मानले जातात. दरम्यान, अनुभवी नगरसेवक दिपक जाधव यांची ठाणे महानगरपालिकेच्या महापौरपदी निवड झाल्यास दिवा परिसरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विकासकामांचा बॅकलॉग भरून निघेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज व नागरी समस्यांवर प्रभावी निर्णय घेणारे नेतृत्व दिव्याला मिळावे, अशी दिव्यातील नागरिकांची इच्छा आहे. महापौरपदाचा अंतिम निर्णय पक्ष नेतृत्वाकडून होणार असला, तरी सध्याच्या घडीला दिपक जाधव यांचे नाव जोरदार चर्चेत असून, त्यांच्या संभाव्य निवडीकडे दिवा परिसराचे लक्ष लागले आहे.

## भिवंडीतील प्रदेश स्तरावर ठरणार भाजप गटनेता

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** पालिका निवडणुकीत भाजपचे २२ नगरसेवक निवडून आले असून गटनेतेपदी कोणाची वर्णी लागणार याचा निर्णय भाजप प्रदेश कार्यालय घेणार असल्याचे शहर अध्यक्ष रवी सावंत यांनी सांगितले.

भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात गटनेतेपदासाठी शुक्रवारी बैठक झाली. यशवंत टावरे, प्रकाश टावरे, संतोष शेट्टी, नारायण चौधरी, सुमित पाटील, वैभव भोईर यांची नावे प्रदेश कार्यालयात पाठवली जातील. महापौरपदासाठी भाजपकडून नारायण चौधरी आणि सुमित पाटील यांचे नाव समोर आले आहे.

# मुरबाड येथे प्रजासत्ताक दिनी न्यू इंग्लिश स्कूल मुरबाडमध्ये देशभक्तीपर संचलन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** दि. २४/०१/२०२६ रोजी न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मुरबाड व स्वामी विवेकानंद इंग्लिश मिडीयम स्कूल मुरबाड यांच्या संयुक्त आयोजनातून शाळेच्या भव्य प्रांगणात २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत संचलन कार्यक्रमाचा सराव करण्यात आला. विद्यार्थी चांगला नागरिक बनावा, विद्यार्थ्यांना स्वयंशिस्त लागावी, आरोग्य जागृती व शारीरिक दृष्ट्या व्यायाम करण्यासाठी प्रेरित करणे या मुख्य हेतुने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमात सुमारे २२५० विद्यार्थी सहभागी होऊन त्यांनी एकाच वेळी देशभक्ती गीतांवर विविध कवायत प्रकारांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. सदर कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष, कार्यसम्राट आमदार सन्माननीय किसनजी कथोरे साहेब यांच्या प्रेरणेने, संस्थेचे सचिव श्री किसन चौधरी सर व सन्माननीय संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाने संपन्न झाला. सदर कार्यक्रमासाठी न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री पाडवी सर, स्वामी विवेकानंद इंग्लिश मिडीयमचे स्कूलचे मुख्याध्यापक बडगुजर सर, संस्थेचे सीईओ निकम सर, उपमुख्याध्यापक सोनवणे सर, उपप्राचार्य कराळे सर, पर्यवेक्षक भालेराव सर, पालक संपर्क अधिकारी जाधव सर व फणसे सर, विभाग प्रमुख सौ. पवार मॅडम, सचिन डोहळे सर तसेच सर्व शिक्षक व विद्यार्थी हजर होते. या कार्यक्रमासाठी केंगळा सर, गवारी सर, खंडागळे सर, देसले सर, तसेच न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि स्वामी विवेकानंद इंग्लिश मिडीयमचे सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.







Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024